## अहवाल

# मागदर्शन आणि उद्बोधन कार्यशाळा

**ठिकाण : -** सरस्वती कक्ष

**व्याख्यात्या : -** 1) प्रा. मा.डॉ. हर्षानी पात्रे .

2) मा. तेजल खेडेकर (समुपदेशक)

**उद्बोधन सत्र तारीख : -** ७ मे २०२५

**मार्गदर्शक प्राध्यापक : -** प्रा. बिजली दडपे.

**प्राचार्य : -** मा .डॉ.रमा भोसले.

**महाविद्यालय : -** शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल

**उद्बोधन सत्राचा उद्देश :-** प्रथम व द्वितीय वर्ष छात्राध्यापकांना मार्गदर्शन व समुपदेशनाच्या विविध अंगांबाबत अधिक जाण व कौशल्य प्राप्त करून देणे हा होता.

मुंबई विद्यापीठाच्या बी.एड अभ्यासक्रमांतर्गत 'मार्गदर्शन व समुपदेशन' या विषयाच्या अनुषंगाने शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल येथे दिनांक ७ मे २०२५ रोजी दुपारी १ वाजता दोन उद्बोधन सत्र आयोजित करण्यात आली . या सत्राचे आयोजन मार्गदर्शक प्रा. बिजली दडपे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. प्रमुख वक्त्या म्हणून प्रा. मा.डॉ.हर्षनि पात्रे मॅडम आणि मा. तेजल खेडेकर मॅडम (समुपदेशक) यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने झाली. दीपप्रज्वलन व पूजन मान्यवरांच्या शुभहस्ते संपन्न झाले. या प्रसंगी महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक, विद्यार्थ्यांसह विविध मान्यवरांची उपस्थिती होती व त्यानंतर कार्यक्रमाची प्रस्तावना व व्याख्यात्यांचा परिचय कार्यक्रमाच्या मार्गदर्शक मा. प्रा. बिजली दडपे मॅडम यांनी केला . आणि उद्बोधन सत्राचे स्वरूप उपस्थितांना समजावून सांगितले गेले. यानंतर उद्बोधन सत्राची औपचारिक सुरुवात झाली.

प्रमुख व्याख्याते मा. प्रा. डॉ. हर्षनी पात्रे मॅडम यांचा सन्मान व स्वागत मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले मॅडम यांच्या हस्ते करण्यात आले. मा.तेजल खेडेकर मॅडम यांचा सन्मान व स्वागत मा.प्रा. बिजली दडपे मॅडम यांच्या हस्ते करण्यात आले.मा. प्राचार्य डॉ .रमा भोसले मॅडम यांचे स्वागत मा.प्रा. बिजली तडपे मॅडम यांच्या हस्ते करण्यात आले .मा. प्रा. बिजली दडपे मॅडम यांचे स्वागत द्वितीय वर्ष छात्राध्यापक रोशनी मॅडम यांच्या हस्ते करण्यात आले .

**प्रथम उद्बोधन :-**

प्रा. डॉ. हर्षनी पात्रे मॅडम यांनी "मार्गदर्शन आणि समुपदेशकाच्या भूमिकेत शिक्षक" या विषयावर अत्यंत सखोल आणि अनुभवाधारित विवेचन केले. त्यांनी शिक्षक हा केवळ ज्ञानदाते नसून विद्यार्थ्यांच्या मानसिक, सामाजिक व भावनिक विकासातही मार्गदर्शक कसा असावा यावर भर दिला. विद्यार्थ्यांच्या समस्या समजून घेणे, त्यांच्याशी संवाद

साधणे आणि त्यांना योग्य दिशेने मार्गदर्शन करणे, ही शिक्षकाची अनिवार्य भूमिका आहे असे त्यांनी नमूद केले.

## द्वितीय उद्बोधन :-

मा.तेजल खेडेकर मॅडम यांनी "व्यसनाधीनतेच्या आहारी जाण्यापासून विद्यार्थ्यांना रोखण्यासाठी शिक्षकांची भूमिका" या विषयावर अत्यंत प्रभावी भाष्य केले. त्यांनी आजच्या युवकांमध्ये वाढती व्यसनाधीनता ही एक गंभीर सामाजिक समस्या असल्याचे सांगितले. शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे वर्तन बारकाईने निरीक्षण करून, त्यांच्याशी संवाद साधत त्यांना व्यसनमुक्त ठेवण्यासाठी सकारात्मक उपाययोजना केल्या पाहिजेत असे त्यांनी स्पष्ट केले.

## सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन:

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रतिभा जाधव मॅडम यांनी केले. कार्यक्रमाच्या अखेरीस रोहिणी पठाडे मॅडम यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे, व्याख्यातेगणांचे तसेच संयोजनात सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# क्षणचित्रे







महाविद्यालयाच्या प्राचार्य सन्माननीय डॉ. रमा भोसले , आणि व्याख्यात्या श्रीमती तेजल खेडकर यांचे स्वागत करताना महाविद्यालयाच्या ज्येष्ठ प्राध्यापिका बिजली दडपे




कार्यशाळेचे प्रास्ताविक करताना महाविद्यालयाच्या ज्येष्ठ प्राध्यापिका बिजली दडपे




मार्गदर्शक आणि समुपदेशकाच्या भूमिकेत शिक्षक या विषयावर उद्बोधन करताना प्रा. डॉ. हर्षणी पात्रे




व्यसनाधीनतेच्या आहारी जाण्यापासून विद्यार्थ्यांना रोखण्यासाठी शिक्षकांची भुमिका यावर सखोल उद्बोधन करताना श्रीमती तेजल खेडकर